8259

जा.क्र/तां/जिअकृअ/वि/डिजीटल व्हिलेज/     /२०१६
कार्यालय- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
अमरावती,दिनांक - ०९/०६/२०१६

**प्रती,**

**१.मा.संशोधन संचालक,डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला.**

**२.प्रमुख,प्रादेशिक संशोधन केंद्र,अमरावती.**

**विषय :- शेंदरी बोंडअळीच्या नियंत्रण या विषयावर मार्गदर्शनाकरीता शास्त्रज्ञ यांना उपस्थित राहण्याच्या सुचना देणेबाबत.**

**संदर्भ :- मा.कृषि संचालक विस्तार व प्रशिक्षण,कृ.आ.पुणे यांचे पत्र जा.क्र/कृमावि/विप्र-४/शेबोंअ/ ९२०/१६, दि.२६/०५/१६**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये,पिकांबाबतच्या विवीध समस्या व विस्तार विषयक बाबी यावर चर्चा तथा मार्गदर्शन करुन त्याबाबतचे संदेश देण्याच्या उदद्देशाने मासिक चर्चासत्र आयोजित करण्यात येते.शेंदरी बोडअळीच्या नियंत्रणाबाबत शेतकरी तसेच जिल्हयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये तांत्रिकदृष्टया जागृती करणे आवश्यक आहे.याकरीता कापुस उत्पादक राज्यांमध्ये जिल्हा मासीक चर्चासत्रात शेंदरी बोंडअळीच्या नियंत्रणात तांत्रिक सत्राचे आयोजन करण्याबाबत संदर्भीय पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत.

~~दिनांक - १४/०६/१६ रोजी क्षेत्रीय भेटीचा कार्यक्रम असुन~~ दि.१५/०६/१६ रोजी तालुका फळरोपवाटीका हॉलमध्ये मासीक चर्चासत्राचे आयोजन करण्यात येणार आहे.तरी,शेंदरी बोडअळीच्या नियंत्रणाबाबत मार्गदर्शन करणेकरीता आपले विद्यापीठातील शास्त्रज्ञ यांना सदरील मासीक चर्चासत्रामध्ये उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे.ही विनंती.

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**
**अमरावती**

प्रत,
१.मा.संचालक (विस्तार व प्रशिक्षण),कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहीतीकरीता सविनय सादर.
२.मा.विभागीय कृषि सहसंचालक,अमरावती विभाग अमरावती यांना माहीतीकरीता सविनय सादर.
३.मा.विभागीय कृषि संशोधन केंद्र,यवतमाळ यांना माहीतीकरीता सविनय सादर.

स्वा

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**
**अमरावती**